UGC Approved Journal
Sr. No. 64310

ISSN 2319-8648

Impact Factor - 2.143

# Current Global Reviewer

International Research Journal Registered & Recognized Higher Education For All Subjects & All Languages

Editor in Chief

Mr.Arun B. Godam

www.rjou

**CURRENT GLOBAL REVIEWER**
UGC Approved Sr. No. 64310 | ISSN : 2319 - 8648 Impact Factor : 2.143
Half Yearly
Issue I Vol II , Jan. To June. 2017


| | | | |
|---|---|---|---|
| 19 | Ancient Indian costume in the period of Mauryan and Sunga (321 – 72 B. C.) | Mrs. Rekha B. Lonikar | 70 |
| 20 | Twentieth-century English literature: An Overview | More J. G. | 73 |
| 21 | "Evaluative Study of contaminated soil and Bioremediation Treatment in Marathwada" | Dr. Sanjay Kale | 76 |
| 22 | The Climate Of The Solapur District | Dr. Gavakare R. B. | 79 |
| 23 | साहित्य और इतिहास भूषण के काव्य के विशेष सन्दर्भ में | संतोष साहेबराव नागरे | 84 |
| 24 | सामाजिक सरोकारिता को निबाहती राजन स्वामी की ग़ज़ल | डॉ. संजय सोपान रणखांबे | 86 |
| 25 | हिंदी ग़ज़लों में आतंकवाद की भयावहता | डॉ. बंग नरसिंगदास ओमप्रकाश | 90 |
| 26 | विषय : साहित्य समाज और हिंदी सिनेमा : एक चिंतन | प्रा.डॉ.एम.ए.येल्लूरे | 93 |
| 27 | बौद्ध दर्शन और असंगघोष की कविता | डॉ.संजय जाधव , प्रा.डहाळे मुंजाभाऊ | 96 |
| 28 | परिवर्तनवादी प्रबोधनकारांचा परिचयः संत गाडगेबाबा | प्रा.डॉ.गायकवाड यशवंत जंगलू | 101 |
| 29 | कौटिल्याचे आर्थिक विचार | डॉ.गोंविद राजाराम परडे | 105 |
| 30 | राष्ट्रीय एकता में शिक्षा का योगदान | डॉ. प्रविण कांबळे | 107 |
| 31 | इक्कीसवी सदी में दलित आन्दोलन | प्रा.डॉ.सौ.मंगला श्री. कठारे | 109 |
| 32 | सर्वेष्वरदयाल सक्सेन कष्त 'लडाई' नाटक की प्रासंगिकता | प्रा.डॉ.संजय जाधव | 111 |
| 33 | "मराठवाड्यातील शेतकऱ्यांच्या आत्महत्या : एक सांख्यिकीय विश्लेषण" | डॉ.नंदकिशोर मुळे | 117 |
| 34 | "मराठवाड्यातील भूमिहीन शेतमजुर : एक सांख्यिकीय विश्लेषण" | शिंदे भगवान | 121 |


S.P.Mahavidyalaya,Bhoom
Bhoom
Ta.Bhoom Dist.O.bad

**CURRENT GLOBAL REVIEWER**

Half Yearly | UGC Approved | ISSN : 2319 - 8648
Issue IX Vol II , Jan. To Jun. 2017 | Sr. No. 64310 | Impact Factor : 2.143

# परिवर्तनवादी प्रबोधनकारांचा परिचय: संत गाडगेबाबा

**प्रा.डॉ.गायकवाड यशवंत जंगलू**
शंकरराव पाटील महाविद्यालय, भूम, ता.भूम जि.उस्मानाबाद
-------------- (28) ---------------------- Dept. of Hindi ------------------------

**संत गाडगेबाबांचे जन्मगाव आणि जीवनकार्य:**

देवमाणूस आणि संत माणूस होउन जगण्यापेक्षा माणूस म्हणूनच मानवतेची आयुष्यभर सेवा करण्यात धन्यता मानणारे गाडगे महाराज यांचा जन्म अमरावती जिल्हयातील दर्यापुर तालुक्यातील 'शेणगाव' येथे 23 फेब्रुवारी 1876 रोजी झाला. त्यांचे पूर्ण नाव 'डेबूजी झिंगराजी जानोरकर' असे होते.

संत गाडगेबाबा त्यांच्या आईच्या माहेरी म्हणजेच अकोला जिल्हयातील मूर्तिजापूर तालुक्यातील दापोरी येथे मामांकडेच लहानाचे मोठे झाले. त्यांच्या विचारामुळे आणि अतिशय साध्या राहाणीमुळे त्यांना 'गोधडी महाराज', 'चिंधेबुवा', 'बट्टीसाधू' इ. विविध नावांनी ओळखले जायचे.

इ.स. 1892 साली त्यांचे लग्न झाले. त्यांच्या मुलीच्या बारशाच्या दिवशी त्यांनी रूढीप्रमाणे दारू व मटणाच्या जेवणाऐवजी गोडधोडाचे जेवण दिले होते. हा त्या काळातील परंपरेला दिलेला छेदच होता.

दिनांक 1 फेब्रुवारी 1905 रोजी त्यांनी घरादाराचा त्याग करून संन्यास स्वीकारला. तेव्हापासून कमरेला गुंडाळलेलं एक वस्त्र, वर ठिगळ लावलेला शर्ट आणि स्वतः बरोबर पाण्यासाठी एक गाडगं याच रूपात बाबा सर्वत्र वावरत असत. तेव्हापासून त्यांना लोक गाडगेबाबा असे म्हणू लागले. सर्वसंग परित्यागानंतर पुढे जवळजवळ 12 वर्ष बाबांनी भारतभ्रमण केले.

झिंगराजी जातीने परीट होते. त्याच्या आईने म्हणजेच सखूबाईने त्यांचे नाव डेबूजी असे ठेवले होते. ते ज्या गावात जात होते, तो गाव झाडून स्वच्छ करत. सार्वजनिक स्वच्छता, अंधश्रद्धा निर्मूलन ही तत्व समाजात रूजविण्यासाठी त्यांनी स्वतः सातत्याने प्रयत्न केले. लोकांनी दिलेल्या दानाच्या पैशामधून रंजल्या–गांजल्या, अनाथ लोकांसाठी राज्यातील ठिक ठिकाणी धर्मशाळा, अनाथालये, आश्रम, व विद्यालये सुरू केली. रंजले–गांजले, दीन दुबळे, अपंग अनाथ हेच त्यांचे देव होते. समाजातील अज्ञान, अंधश्रद्धा, भोळ्या समजूती, अनिष्ठ रूढी–परंपरा दूर करण्यासाठी त्यांनी आपले पूर्ण आयुष्य वेचले. यासाठी त्यांनी किर्तनाच्या मार्गाचा अवलंब केला. त्यांच्या सर्व संगपरित्यागानंतर पुढे जवळजवळ बारा वर्ष बाबांनी भटकंती केली. त्यांच्यात एका समाजकांतीकारकाचा जन्म झाला. खेडयापाडयातून समाजाची सेवा करत लोकजागृती करणे हेच पुढील आयुष्याचे ध्येय मानले.

मला कुणी गुरू नाही आणि मी कोणाचाही गुरू नाही हीच भावना ठेवून त्यांनी समाजाला प्रबोधन केले. समाजातील अज्ञान, अंधश्रद्धा, अस्वच्छता या समाजाच्या विरूद्ध मतीतुन बहुजन समाज बाहेर पडावा म्हणून त्यांची सतत धडपड असे. त्यासाठी बाबा समज असणाऱ्यांना शब्दाने फटकारीत तर कधी कधी हातातल्या काठीचा फटका मारूनही शहाणं करीत आणि हे वागण फक्त शब्दापुरत मर्यादित नव्हतं तर हातात खराटा घेउन बाबा स्वतः गावाची स्वच्छता करून लोकांना धडा घालून देत असत. संत गाडगेबाबांचे उपदेशही साधे सोपे असत. चोरी करू नका, सावकाराकडून कर्ज काढू नका, व्यसनांच्या आहारी जाउ नका, देवा धर्माच्या नावाखाली प्राण्यांची हत्या करू नका, जातीभेद व अस्पृश्यता पाळू नका असे ते आपल्या कीर्तनातून सांगत असत. देव दगडात नसून तो माणसात आहे, हे त्यांनी सर्वसामान्यांच्या मनावर ठसविण्याचा प्रयत्न केला. ते संत तुकाराम महाराजांना आपले गुरू मानत असत. आपले विचार साध्या भोळया लोकांना समजण्यासाठी ते ग्रामीण भाषेचा प्रामुख्याने वैदर्भीय बोलीचा उपयोग करीत असत.

संत गाडगेबाबांचे एक स्वप्न होते ते म्हणजे सुधारणेचे ते म्हणत की फक्त खेडयापाडयातील रस्ते स्वच्छ करून चालणार नाहीत, तर त्यातील प्रत्येक जण स्वच्छ संस्कारित असावेत. त्यासाठी बाबा आयुष्यभर झटले. हे कार्य करीत असतांना अनेकांनी मदत देउ केली. पण लोकाकडून मिळालेला पैसा ते समाजालाच अर्पण करीत असत. कर्मवीर भाउरावांच्या शैक्षणिक कार्यासाठी बाबांनी अनेकवेळा आपली ओंजळ रिकामी केली होती. त्यांनी स्वतःचे आयुष्य म्हणजेच 'लोक संस्कार पीठ' बनविले होते.

दिनांक 08 फेब्रुवारी 1952 रोजी ' श्री गाडगेबाबा मिशन' स्थापन करून महाराष्ट्रभर शिक्षणसंस्था व धर्मशाळा स्थापन केल्या. 'गोपाला गोपाला देवकीनंदन गोपाला' हे गाडगे महाराजांचे आवडते भजन होते.

S.P. Mahavidyalaya, Bhoom, Tq.Bhoom Dist.O.bad

आचार्य अत्रे गाडगेबाबाबद्दल म्हणतात, 'सिंहाला पाहावे वनात, हत्तीला पाहावे रानात, तर गाडगे बाबांना पाहावे कीर्तनात।

हिंदू मुसलमान एकच आहेत ते सांगतांना बाबा अगदी लहान लहान प्रश्न विचारीत असत. तुमच्या रक्ताचा रंग कसा? लाल, 'देहत्याग केल्यावर या शरीराचे काय होते? माती' जे हिंदुच्या शरीराचे होते. मग हिंदू आणि मुसलमान यात भेदाभेद कशाला? गाडगे बाबांच्या अशा बोलण्याने लोक अंतर्मुख होत असत. त्या वेळेपुरता गाडगेबाबांच्या शिकवणुकीच जनसामान्यावर चांगला परिणाम होई पण समाजास शतकानुशतके पडलेले वळण चिरस्थायी बदल घडू देत नसे. समाजाचे पुन्हा ' ये रे माझ्या मागल्या' असे चालूच असते.

आसमंतातील परिसरातील घाणकचरा एकदा दोनदा झाडून टाकला, तरी तो परत परत जमा होतोच. लोकांच्या मनातील कुविचारांचा कचरा आणि तण बाजूला केले तरी परत तेथे उगवतेच. समाजमनामध्ये चांगले विचार रूजविण्याचे प्रयत्न सातत्याने चालू राहिले पाहिजेत, असे प्रयत्न मनोभावे करणारे गाडगे बाबां वारंवार जन्म घेत नसतात. हेच सत्य.

20 व्या शतकातील थोर समाजसुधारक डेबुजी झिंगराजी जाणोरकर म्हणजे महाराष्ट्राचे लोकप्रिय संत गाडगे महाराज होय. श्री संत गाडगे बाबा म्हणजे मानवतेचा उद्गाता, दलितांचा कैवारी, दीन दुबळयांचा त्राता, स्वच्छतेचा पुजारी, विदर्भाच्या मातीतुन जन्मास आलेला एक अनमोल हिरा।

संत गाडगेबाबा स्वतः अशिक्षित होते. लिहिणे वाचणे त्यांना येत नव्हते. तरीही त्यांनी शून्यातून मोठा पसारा उभा केला. गावोगावी शाळा काढल्या, धर्मशाळा उभारल्या. पाणपोया, नदीचे घाट बांधले, जीवनाच्या चढ उतारातुन अनुभव घेत आकारास आलेला हा निरक्षर विद्वान स्वतःच्या कष्टमयी जीवनातुन ते बरेचसे शिकले. माणूस कसा आहे? तो कसा असायला हवा? आणि या साठी आपण काय केले पाहिजे? याचा विचार करून संत गाडगे बाबांनी 'माणुसपणाच्या उगवणीसाठी विचारांची पेरणी' ही प्रत्यक्ष कृतीद्वारे केली.

तत्कालीन समाजाला वाट दाखविली. पशु हत्या, ग्राम स्वच्छता, आरोग्य, सावकारी कर्ज, शिक्षण, अनिष्ट प्रथा, स्पृश्या अस्पृश्यता, व्यसनाधिनता, श्रमप्रतिष्ठा असे आजही भयावह वाटणारे प्रश्न त्याकाळी गाडगे बाबांनी खराटा आणि वाणी यांच्या जोरावर अत्यंत कुशलतेने हाताळले.

**कीर्तनकार—गाडगे बाबाः**

भारताच्या सामाजिक, सांस्कृतिक इतिहासात महान कार्य केलेल्या संत महात्म्यांच्या मालिकेतील एक अत्यंत महत्वाचा दुवा म्हणजेच संत गाडगे बाबा. सर्वसामान्य माणसाच्या कल्याणाची तळमळ आणि आत्यंतिक ही संताच्या कार्याची मूळ कल्पना, प्रेरणा व त्याच प्रेरणेतुन त्यांनी आपले आयुष्य खर्ची घातले. सर्वसामान्य लोकांना आपले हित कशात आहे आणि अहित कशात आहे हे पाहण्याचा डोळसपणा प्राप्त व्हावा म्हणून त्यांनी कीर्तनाच्या माध्यमातून प्रबोधनाचे काम हातात घेउन लोकांची मने घडविण्याचे व मनामध्ये परिवर्तन घडवून आणण्याचे महान कार्य केले.

कीर्तन हे समाज प्रबोधनांचे फार प्रभावी साधन आहे. ते आपल्या कलेतुन रसिकांच्या हदयालाही भिडले. आणि विज्ञानाप्रमाणे त्यांच्या मेंदूलाही योग्य वळण लावले. या आधुनिक युगात गाडगे बाबांनी या माध्यमांचा अत्यंत प्रभावी वापर केला. संत गाडगे बाबा यांचे चरित्र वाचले म्हणजे आपल्या लक्षात येईल की, 'बाबा हाच मोठा चालता बोलता चमत्कार आहे' असे आपल्या लक्षात आल्याशिवाय राहणार नाही.

अज्ञान, विषमता, शोषण, अन्याय यातच बाबांनी धर्माचे रूप प्राप्त झालेल्या आपल्या समाजाला ईश्वराचे आणि धर्माचे मानवतावादी दर्शन घडविण्याचे जे महान कार्य गाडगे बाबांनी केले, त्याला तोड नाही. इतर संतानी लोकांना देवळात नेले व संत गाडगे बाबांनी लोकांना माणसात आणले. गाडगे बाबा म्हणायचे बापहो देव देवळात नाही, माणसात आहे. माणसायले ओळखा, माणसायले ओळखा, खरा देव हा माणसातच आहे.

गाडगेबाबा दिवसा गाव खराटयाने साफ करीत आणि रात्री कीर्तनाच्या माध्यमातून लोकांची मने साफ करीत. देव हा देवळात नाही देव तिर्थात नाही. यासाठी ते संत कबीराचा पुरावा देतात.

जत्रे मे फथरा बिठाया
तिरथ बनाया पानी।
दुनिया भई दिवानी
सारी पैसेकी धुलधानी।।

गाडगेबाबा अशिक्षित त्यांची सही निशाणी अंगठाच. परंतु अति विद्वानाला लाजवील अशी भाषा चालत बोलतं विद्यापीठच त्यांनी समाजाला सोप्या भाषेत सांगितले. संत गाडगे बाबा म्हणजे एक गावंढळ माणूस



S.P. Mahavidyalaya, Bhoom, Bhoom, Tq. Bhoom, Dist. O.bad

शिक्षणाचा कोणताही गंध नसलेला. लिहिता वाचता येत नाही. अज्ञानी, अशिक्षित माणूस या माणसाला कसलेच पूरक वातावरण नाही. कोणत्याच गुरू बाबांचा उपदेश नाही. सल्ला, बोध, सहकार्य मदत किंवा मार्गदर्शन नाही असे असतांना सुध्दा आज 21 व्या शतकात सुध्दा कोणताही सुधारक, बुध्दी प्रामाण्यवादी अगर विज्ञानवादी, विचारवंत जे काम इतक्या सहजपणे निर्भयपणे व निर्भिडपणा करू शकणार नाही. ते महान कार्य संत गाडगेबाबांनी या देशात 70 वर्षापूर्वी केले.

**सामाजिक कांतीचे अग्रदूत**

19 व्या शतकात सामाजिक कांती करणारे महात्मा ज्योतिबा फुले व त्यांच्या विचारांचा धागापुढे चालू ठेवणारे संत गाडगे बाबा यांनी समाजातील धर्माच्या नावाखाली चाललेला अन्याय दूर करण्यासाठी शेवटपर्यंत आपले आयुष्य खर्ची घातले. त्यांच्या आईकडून श्रमसंस्काराची रूजवण झालेली असल्या कारणाने ते गावातील मुलांसोबत मामांची गुरे शेतात घेउन जात असत. विविध जातीच्या मुलांसोबत खेळणे, जेवणे यामुळेच त्यांच्यावर सर्वधर्म समभावाची शिकवण झाली. म्हणजे गोपाला, बहुजन प्रतिपालन या नात्याने त्यांचा आदर्शच होता. त्यांच्या भजनाद्वारे त्यांनी समाजामध्ये समतावाद रूजविला.

भारतामध्ये वेगवेगळया कामाचे वर्गीकरण हे जात लिंगभेदावर केलेले आहे. सध्या एकीकडे स्वच्छता मोहिम चालू आहे. तर दुसरीकडे जातीय खटके उडत आहेत. खऱ्या अर्थाने स्वच्छतेचे मूळ हे जातीय निर्मूलनमध्येच आहे. हे आजच्या समाजमनाने ओळखले पाहिजे. स्वच्छता व अस्पृश्यता मानवाच्या मनातुन निघून जावी. सगळीकडे शिक्षणाचा प्रचार प्रसार व्हावा याकरिता संत गाडगे बाबांनी संपूर्ण आयुष्य खर्ची घातले. राष्ट्रीय व सामाजिक ऐक्यासाठी प्रयत्न केले म्हणूनच त्यांना समाजवादी संत असे सुध्दा म्हटले जाते. त्यांनी दीन दुबळयांची सेवा, गरीब मुला मुलीसाठी शिक्षणाची सोय, पशुपक्षासाठी अभय हाच धर्म समजला म्हणूनच ते खरे समाजकांतीचे अग्रदूत ठरले.

संत गाडगे बाबांना आपल्या आयुष्यात निरक्षरतेची फार मोठी किंमत मोजावी लागली होती म्हणून त्यांनी समाजातील, तळागाळातील लोकांना शिक्षणाचा आग्रह धरला व कर्मवीर भाउराव पाटील, पंजाबराव देशमुख यांच्या कार्याला हातभार लावला. संत गाडगेबाबांनी संपूर्ण महाराष्ट्राची शाळा बनून ग्रामीण भागामध्ये अस्पृश्यता व अंधश्रध्देचे धडे दिले. त्यांचा भर हा गोरक्षणावर होता. बाबा विचारवंत होते तसेच ते आचारवंत ही होते. संत तुकाराम महाराज यांच्या अभंगाद्वारे त्यांनी झोपलेल्या समाजाला जागे केले. दारू बंदीसाठी प्रयत्न करणारा समाजसेवक म्हणून ही त्यांची ओळख आहे. लाखो अंध, अपंग, मूकबधीर, लोकाविषयी त्यांच्या मनात तळमळ होती. संत गाडगेबाबांना चांगलीच श्रमशक्ती, तल्लख बुध्दीमत्ता व सूक्ष्म निरीक्षण शक्ती, ग्रहणशक्ती लाभली होती.

**लोकशिक्षणाचे कर्मयोगी**

बुध्द, कबीर, म.फुले व डॉ.बा.आंबेडकर या महामानवांचा उपदेश व तत्वज्ञान जीवनाच्या अंतिम क्षणापर्यत बहुजन समाजातील अशिक्षित जनतेपर्यत आपल्या कीर्तनाद्वारे सांगणारे, अज्ञानी, भोळया भाबडया शोषित, पिडीत व तळागाळात खितपत पडलेल्या जनतेच्या, व्यथा, वेदनांना आपल्या किर्तनाद्वारे वाचा फोडणारे, धार्मिक रूढी, परंपरा, अंधश्रद्धा, कर्मकांड, देवधर्म, विषमता अनिष्ठ प्रथा, जातिभेद हिंसा व हुंडा पध्दती यावर आसूड ओढणारे हीन दीन पददलित जनतेला प्रबोधनाचा डोस, पाजून माणूसपण मिळवून देणारे कर्मयोगी, वैराग्यमूर्ती म्हणजे संत गाडगेबाबा होय.

कीर्तन हे गाडगे बाबांचे खरे सामर्थ्य आहे. आपल्या खेडवळ लाडक्या वऱ्हाडी बोलीमध्ये तासनतास ते हजारो श्रोत्यांना मंत्रमुग्ध करून ठेवत. काव्य आणि विनोद यांचा धबधबा त्यांच्या मुखातुन वाहायचा. कीर्तनाचा विषय एकच गरीबांचा आणि दलितांचा उध्दार करणे. स्त्री पुरूष आणि मुले बाबांच्या भोवती जमायची आणि टाळयांच्या तालावर 'गोपाला, गोपाला देवकीनंदन गोपाला' हे भजन गायची. त्यांचे कीर्तन ऐकण्यासाठी 20 ते 25 कि.मी. अंतरावरून मोठया प्रमाणात जनता यायची आणि मौलिक उपदेश ऐकुन व तृप्त होउन आपापल्या गावाला परत जायची. डॉ.पंजाबराव देशमुख, कर्मवीर भाउराव पाटील, प्रल्हाद केशव अत्रे हे त्यांचे कीर्तन आवर्जून ऐकत असत. गाडगे बाबांना देवतांचा बाजार मुळीच मान्य नव्हता. ते म्हणत देव कधी नवसाला पावत नाही, देव कधी कोणाला डोळयांनी दिसत नाही. मनुष्याला जी बुध्दी मिळाली तिचा विकास अवश्य करा. मुलांना लहानाचे मोठे करा व खूप शिकवा. संत गाडगे बाबांनी दगडाच्या देवाला महत्व न देता माणसालाच जास्त महत्व दिलेले असून मानवसेवा हीच खरी ईश्वर सेवा आहे, असे म्हटले आहे. ते मूर्ती पूजेच्या प्रखर विरोधात होते. खऱ्या अर्थाने जे सुशिक्षितांना जमले नाही ते एका अशिक्षित परिवर्तनवाद्याने करून दाखविले.




S.P. Mahavidyalaya, Bhoom • Bhoom • Tq. Bhoom Dist. O.bad

Half Yearly | UGC Approved | ISSN : 2319 - 8648
Issue IX Vol II , Jan. To Jun. 2017 | Sr. No. 64310 | Impact Factor : 2.143

**महापुरूष–संत गाडगे बाबा–**

महाराष्ट्र म्हटले की सर्वप्रथम आठवते तो पुरोगामी विचार या महाराष्ट्राला लाभलेले संत महात्मे, या देशात या महाराष्ट्राची एक वैचारिक ओळख निर्माण करणारे राष्ट्रसंत अशा संताच्या मानवतावादी विचार सरणीने पावन झालेल्या या महाराष्ट्राला विसाव्या शतकात असेच एक संत लाभले. मानवांना माणूस म्हणून जगण्याचे सामर्थ्य शिकवून देऊन स्वच्छतेचा मंत्र या जगाला अर्पित केला, असे थोर समाजसुधारक संत म्हणजे राष्ट्रसंत संतश्रेष्ठ संत गाडगे महाराज.

महाराष्ट्रात अनेक संत होउन गेले प्रत्येक संतानी देशाला मानवतावादी विचारांचा पाईक बनविण्यात आपले सारे आयुष्य खर्ची घातले. तथागत गौतम बुध्दापासून ते संत तुकडोजी महाराजापर्यंत समाज प्रबोधनातुन, समाज परिवर्तित अशा वेगवेगळया स्वरूपात समाजाला लागलेल्या अनेक अंधश्रध्दा, कर्मकांड, द्वेष, विषमता नष्ट करीत आपलं अस्तित्व संपवून समाजाचे अस्तित्व निर्माण केले. त्यातच प्रेक्षणीय असलेले बुध्दांचे वैचारिक वारस म्हणून विसाव्या शतकात असा एक संत होउन गेला की त्यांने आपला संसार लागून मानवी जीवनाच्या दैवत्व त्यांनी जगाला दाखविले, ते म्हणजे संत गाडगे बाबा."

विज्ञानवादी विचारांचा प्रचार प्रस्थापित व्यवस्थेत ज्यांनी निस्वार्थपणे केला ते आज संत म्हणून आठवणीत राहिले. संत गाडगे महाराजांचे प्रबोधन हे नेहमी विज्ञानवादी, मानवतावादी विचारांनी साकारलेले होते. समाजाने दान करणे नव्हे तर देणे शिकावे. ही मानवतावादी शिकवण देणारे गाडगे बाबत होते. अनेक अनेक दुःखी जीवनावर बोलतांना म्हणायचे, दुःखाचे डोंगर चढल्याशिवाय सुखाचे किरण दिसत नाही. प्रत्येकाच्या आयुष्यात दुःख असतेच त्या दुःखाला न खचता त्याचा सामना करायला शिका. माणसाचे खरोखर देव कोण असतील तर ते आई–वडील आहेत. आपल्याला जन्म देणारे हेच खरे देव आहेत. त्यांची सेवा करा, म्हणजे तीच ईश्वर सेवा होय. दगडाचे पूजन, आणि आई वडीलांना मात्र आश्रमात ठेवता. 'तुले कुठे सापडलेत देव? मी ब्राम्हण, तू वैश्य, तू क्षत्रिय, तू शुद्र असे म्हणणाऱ्या मार्तडयानो देशात केवळ दोनच जाती आहेत, ती म्हणजे पुरूष आणि स्त्री, म्हणून आम्ही सर्व एकाच रक्ताचे नातलग आहोत. आपला नातलग संकटात असतांना आपल्यालाच धाव घ्यावी लागते. हीच तर खऱ्या देवाची पूजा आहे.

आज खरी गरज अशा संताच्या विचारांची आहे. केवळ विचारांचीच नसून त्यांच्या सारख्या विचारांची, आचरणांची देखील समाजाला सक्त गरज आहे. गाडगे बाबा म्हणायचे माणसाने माणसाबरोबर माणसासारखे वागावे. हाच बोध मी ग्रहण केला आहे. शिक्षणाचे माणसाचे जीवन फुलते आपण हया जगात कशासाठी आलो आहोत हे कळते, म्हणून शिक्षित व्हा. शिक्षण हे समाज परिवर्तनाचे साधन आहे.

भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर, कर्मवीर भाउराव पाटील, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज, राष्ट्रसंत गाडगे महाराज हे विसाव्या शतकातील थोर समाज सुधारक होउन गेले. आज त्यांचे अस्तित्व नसेल ही, मात्र त्यांनी पेरलेल्या विचारांचे अस्तित्व आजही जीवंत आहे. म्हणूनच एकही दिवस शाळेत न जाता गाडगे बाबांचे नाव त्या अमरावतीच्या विद्यापीठाला दिले गेले. यावरूनच गाडगे महाराजांच्या सामर्थ्याचे दर्शन घडते.

**संदर्भग्रंथ**


1. श्री संत गाडगेबाबा – प्रबोधनकार के.सी.ठाकरे– विनिमय पब्लिकेशन्स, राजरत्न ठोसर एल.बी.एस. मार्ग, विक्रोळी (प) मुंबई 400 033 दुसरी आवृत्ती Sep.2015
2. श्री संत गाडगेबाबा – प्रबोधनकार के.सी.ठाकरे– नाग नालंदा प्रकाशन इस्लामपूर संपा.डी.जे.जाधव प्रथमावृत्ती, 17 मार्च 1992

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 3. | दै.सम्राट पेपर | सोमवार | 23 फेब्रु. 2009 | 03 |
| 4. | दै.लोकमत | रविवार | 06 फेब्रु. 2011 | 05 |
| 5. | दै.तरूण भारत | सोमवार | 20 डिसें. 2013 | 04 |
| 6. | दै.पुण्यनगरी | शुक्रवार | 20 डिसें.2013 | 03 |
| 7. | दै.पुण्यनगरी | शनिवार | 23 फेब्रु. 2016 | 04 |
| 8. | दै.सम्राट | सोमवार | 20 डिसें. 2016 | 06 |
| | दै.सम्राट | शनिवार | 24 डिसें. 2016 | 03 |




S.P.Mahavidyalaya Bhoom Tq.Bhoom Dist.Osmanabad BHOOM
PRINCIPAL
S.P.Mahavidyalaya, Bhoom
Dist.Osmanabad